MHOS070013352025

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ४२६/२०२५**

**प्रणव वि. बाबु व इतर**

**निशाणी क्रमांक ११ वर आदेश**

**१.** गैरअर्जदार क्रमांक १ ते ३ यांनी सदरचा अर्ज "म्हणणे नाही" असा हुकूम रद्द होऊन दाव्यास म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी केला आहे.

**२.** गैरअर्जदार क्रमांक १ ते ३ यांचे असे कथन आहे की, प्रस्तुत अर्ज दिनांक २२/०१/२०२६ रोजी ते न्यायालयात उपस्थित राहून दाव्यामध्ये म्हणणे दाखल करू शकले नाहीत. दावा हा स्थावर मिळकती विषयी आहे. वाद विषयाची सत्य वस्तुस्थिती समोर येणेसाठी, दाव्याचे अनेकीकरण टाळण्यासाठी गैरअर्जदार यांचे म्हणणे दाखल होणे गरजेचे आहे. अर्ज मंजूर न झाल्यास कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे. या सर्व कारणासाठी त्यांना म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळणेची विनंती केली आहे.

३. अर्जदार यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल केले. अर्जदार यांनी असे कथन आहे की, गैरअर्जदार यांना दिनांक १८/०७/२०२५ रोजी दाव्याचे समन्स प्राप्त झाले व ते दिनांक ०५/०८/२०२५ रोजी ते हजर होवुन देखील त्यांनी म्हणणे दाखल केले नाही. अर्जामधील कारण चुकीचे आहे. यामुळे सदरचा अर्ज खर्चासह नामंजुर करणेची विनंती केली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. सदर कामी गैरअर्जदार यांना दाव्याचे समन्स लागू झाले पासून ९० दिवसांचे कालावधीत म्हणणे दाखल करणे आवश्यक आहे. परंतू त्यांना म्हणणे दाखल करणेस उशीर झाल्याचे नमुद केले आहे. सदरचा दावा हा निरंतर मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे.

त्यासाठी दावेच्या अंतिम निर्णयासाठी गैरअर्जदार यांना म्हणणे मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. गैरअर्जदार यांचाअर्ज मंजूर केलेस अर्जदार यांचे कोणतेही नुकसान होणार नाही परंतू दावेचा गुणावगुणावर निर्णय होणेस मदत होणार आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार यांचे म्हणणे दाखल करून घेणेत यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GEETA PRAVIN BANKAR
Date: 2026.04.10 16:59:13 +0530

उमरगा. (गीता प्र.बनकर)
दि. १०/०४/२०२६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उमरगा

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Shri. Suresh B. Bhingare,<br>stenographer G-III |
| Court | --- | Geeta P Bankar<br>Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Omerga |
| Date | --- | 10/04/2026. |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 10/04/2026. |
| Order uploaded on | --- | 10/04/2026. |